Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२—ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/१८५५
पुणे – ४११ ००४
दिनांक २९/०५/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय — माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जून—जुलै २०२५ अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून—जुलै २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२९/०५/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारीत मुदत संपल्यानंतर अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/— प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/—प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.२००/—प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|
| शुक्रवार दि.३०/०५/२०२५ ते शनिवार दि.०७/०६/२०२५ | रविवार दि.०८/०६/२०२५ ते रविवार दि.१५/०६/२०२५ | सोमवार दि. १६/०६/२०२५ ते सोमवार दि. २३/०६/२०२५ |

१.सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पद्धतीने (www.mahahsscboard.in) या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. माध्यमिक शाळांनी चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित माध्यमिक शाळांकडून घेण्यात यावी.

२.त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव / जन्मतारीख / विषय / माध्यम याबाबत Prilist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास प्र पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करुन घेणंबाबत माध्यमिक शाळांना सूचित करण्यात यावे.

३.प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित माध्यमिक शाळाप्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलिंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

४. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(देविदास कुलाळ)
**सचिव**
**राज्यमंडळ, पुणे ४.**

**<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>**

१) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे ४.
२) लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/2065
कोल्हापूर- ४१६ ००४
दिनांक-३०/०५/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२५ अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.
संदर्भ:- क्र.रा.मं./ले-पे०६/परीक्षा शुल्क २०२५-२६/१४५४ पुणे-४ दि.२४/४/२०२५

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र जून-जुलै २०२५ पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची उपरोक्त पत्रानुसार नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यवाही करावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर